एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पातील
कर्मचारीवृंदाचा सुधारित आकृतीबंध
मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि.२००३/प्रक्र.४३८/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ जानेवारी, २००४

वाचा :- १. शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक एबावि ३३३९/प्रक्र.३७५/का.६(अ).
दि. २.११.१९९९.
२.केंद्र शासन, मनुष्य बळ विकास मंत्रालय, महिला व बाल विकास, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक
१-३/२००२-CD-I (VOL-III), दिनांक २२.८.२००३.

शासन निर्णय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने ती केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत जुन्या तसेच नवीन प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधात एकसुत्रीपणा आणण्याकरिता सर्व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पातील कर्मचारीवृंदाच्या आकृतीबंधाची पुर्नरचना करण्याचे आदेश संदर्भ क्रमांक २ अन्वये केंद्र शासनाने निर्गमित केले आहेत. केंद्र शासनाच्या या आदेशानुसार सर्व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या पदांची खालीलप्रमाणे तात्काळ परिणामाने पुर्नरचना करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता [illegible] येत आहे.

| [illegible] | पदाचे नाव | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी | १ |
| २ | सहाय्यक किंवा सांख्यिकी सहाय्यक | १ |
| ३ | पर्यवेक्षिका | २५ अंगणवाडी केंद्रासाठी एक |
| ४ | लिपिक टंकलेखक | १ |
| ५ | शिपाई | १ |

२. प्रत्येक एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्पात वरील प्रमाणे कर्मचारीवृंदाची नेमणूक करताना खालील नियमांचे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

१. ज्या प्रकल्पांमध्ये बाल विकास प्रकल्प अधिकारी व सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी अशी दोन्ही पदे कार्यरत आहेत. तेथे सदर दोन्ही पदांपैकी एक पद ज्यावेळेस रिक्त होईल त्यावेळेस ते भरण्यात येऊ नये जेणेकरून प्रत्येक प्रकल्पात बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी यापैकी एकच पद कार्यरत राहील. उर्वरित रिक्त पद व्यपगत होईल

२. ज्या प्रकल्पांमध्ये बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी असे कोणतेही पद कार्यरत नाहीत तेथे यापैकी बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी असे एकच पद भरण्यात यावे. सदर पद हे इतर प्रकल्पातून (जेथे बाल विकास प्रकल्प अधिकारी व सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी अशी दोन्ही पदे कार्यरत आहेत) भरण्यात यावेत. हे शक्य नसल्यास नव्याने नेमणूक करण्यात यावी. अंतिमतः रिक्त पदे व्यपगत होतील.

३. ज्या प्रकल्पात बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी यापैकी एक पद कार्यरत असेल तेथे उर्वरित रिक्त पद (बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी) भरण्यात येऊ नये आणि रिक्त पद व्यपगत होईल.

४. सर्वसाधारणपणे २५ अंगणवाडी केंद्रासाठी एक पर्यवेक्षक राहील. जेथे २५ अंगणवाडी केंद्रासाठी एकापेक्षा अधिक पर्यवेक्षिका असतील तेथे त्यावेळेस ज्यादा पर्यवेक्षिकांची पदे रिक्त होतील, त्यावेळी ती भरण्यात येऊ नये व अंतिमतः ती रिक्त पदे व्यपगत होतील.

५. ज्या प्रकल्पातील २५ अंगणवाडी केंद्रासाठी एक पर्यवेक्षिकेचे पद कार्यरत नसेल तेथे पर्यवेक्षिकेचे पद हे इतर प्रकल्पातून (जेथे २५ अंगणवाडी केंद्रासाठी एकापेक्षा जास्त पर्यवेक्षिकेची पदे कार्यरत असतील) भरण्यात यावीत. हे शक्य नसल्यास नव्याने नेमणूक करण्यात यावी. अंतिमतः रिक्त पदे व्यपगत होतील.

६. ज्या प्रकल्पांमध्ये सहाय्यक आणि सांख्यिकी सहाय्यक अशी दोन्ही पदे कार्यरत असतील तेथे सदर दोन पदांपैकी एक पद जेव्हा रिक्त होईल त्यावेळेस ते भरण्यात येऊ नये जेणेकरून एका प्रकल्पात सहाय्यक किंवा सांख्यिकी सहाय्यक यापैकी एकच पद कार्यरत राहील. उर्वरित रिक्त पदे व्यपगत होतील.

७. ज्या प्रकल्पात सहाय्यक किंवा सांख्यिकी सहाय्यक यांची एकही पद कार्यरत नसेल तेथे सहाय्यक किंवा सांख्यिकी सहाय्यक यांची एकच पद भरण्यात यावे. सदर पदे हे इतर प्रकल्पातून (सहाय्यक किंवा सांख्यिकी सहाय्यक ही दोन्ही पदे कार्यरत असलेल्या) भरण्यात यावीत. हे शक्य नसल्यास नव्याने नेमणूक करण्यात यावी. उर्वरित रिक्त पदे व्यपगत होतील.

८. ज्या प्रकल्पांमध्ये सहाय्यक किंवा सांख्यिकी सहाय्यक यांची एकच पद कार्यरत आहे तेथे उर्वरित रिक्त पद (सहाय्यक किंवा सांख्यिकी सहाय्यक) भरण्यात येऊ नये आणि रिक्त पद व्यपगत होईल.

९. यापुढे मंजूर आकृतिबंधाबाहेरची पदे जेव्हा रिक्त होतील तेव्हा ती भरण्यात येऊ नये. सदर रिक्त पदे व्यपगत होतील.

३. या आदेशाचे काटेकोरपणे पालन करून त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वी. एम. फोपळणकर)
उप सचिव

प्रति,

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई.
प्रकल्प समन्वयक, राज्य व्यवस्थापन कक्ष, जागतिक बँक सहाय्यित एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प-३, रायगड भवन, नवी मुंबई
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण), जिल्हा परिषद.
संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, ठाणे.
उप लेखा निरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती
संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, का.६